MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात






बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२७० | रविवार दि.२३ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४


Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -270 | SUNDAY DT. 23 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# एस पी नंदकुमार ठाकूर साहेब गोदापात्राच्या काठावर पोलिसांची वसूली जोरात डिवाएसपी निरज राजगुरुना विचारतील का?

## गेवराई तालुक्यातून बेफाम अवैध वाळू उपसा; डीवायएसपी निरज राजगुरू हे फक्त नावालाच?




- राजकीय वरदहस्त लाभलेल्या डिवाय एसपी निरज राजगुरूना आमदार लक्ष्मण पवारची साथ?
- चकलांबा, गेवराई, तलवाडा, ठाण्यात वाळू माफियाचा वावर जास्तच एस पी नंदकुमार ठाकूर साहेब गेवराईचे डिवाय एस पी तुमच्या हद्दीतील गेवराई, तलवाडा, चकलांबा, डिवाय एसपीच्या जवळचे पोलीस कर्मचारी व वाळू माफीयांचे फोन कॉल डिटेल्स चेक करा.
- डि वाय एस पी निरज राजगुरू तुमच्या हद्दीतील तुम्ही रस्त्यावर किती उतरून केलेल्या कारवाईचा आकडा किती सांगतील का?




गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळूचा उपसा जोरात सुरू आहे. याकडे महसूल विभागाचे आणि डीवायएसपी नीरज राजगुरू हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून डोळेझाक करीत असल्याची चर्चा सुरू आहे. हा अवैध वाळू उपसा तातडीने थांबवावा अशी मागणी होत आहे. गेवराई तालुक्यातील गुंतेगाव, राक्षसभुवन, माळसपिंपळगाव, बोरगाव, सावरगाव, हिंगणगाव, जोगलादेवी आदी ठिकाणाहून अवैधरीत्या वाळूची मोठ्या प्रमाणात रोजरोज बेसुमार उपसा सुरू आहे. याकडे डीवायएसपी नीरज राजगुरू तसेच संबंधित पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हे वाळू माफियाविरूद्ध ठोस कारवाई करीत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच वाळू माफिया विरोधात ठोस कारवाई करण्याची हिंमत होत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पोलिसांच्या दुर्लक्षामुळे वाळू माफियांची हिंमत वाढत चालली आहे. वाळू माफियांना पोलीस प्रशासन पाठीशी घालत तर नाही ना? असे नागरिकांतून दबक्या आवाजात बोलले जात आहे.

संबंधित पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वरील नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून अहमदनगर, औरंगाबाद या जिल्ह्यात वाळू जात आहे. सततच्या वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या अवजड वाहतूकीमुळे गेवराई तालुक्यातील रस्त्यांची दैना झाली आहे. रस्ते दुरुस्त केल्यानंतरही वाळू वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे तात्काळ खराब होतात. त्यामुळे वाहन चालक व स्थानिक नागरिकांचे हाल होत आहेत. शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांनाही अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे डीवायएसपी नीरज राजगुरू याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. गेवराई तालुक्यात वाळू माफियांनी प्रचंड दहशत निर्माण केली आहे. पोलीस आणि महसूल कर्मचाऱ्यांसोबत असलेल्या अर्थपूर्ण संबंधांमुळे या वाळू माफियां विरोधात बोलण्याचे धाडस कोणी करीत नाही.

वाळू वाहतूक करणारे हायवा, डंपर, ट्रॅक्टररसह इतर वाहने भरधाव वेगात असतात. त्यामुळे अरूंद रस्त्यांवर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे पोलीस प्रशासन, महसूल प्रशासनाने अशा वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

शासनाच्या महसुलावर दरोडा टाकणाऱ्या वाळू माफियांना जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी आवर घालावा? गेल्या काही दिवसांपासून महसूल व पोलिस विभागाच्या आशीर्वादाने नदीपात्रातून दिवसाढवळ्या शेकडो ब्रास वाळूची अवैध उपसा सुरू आहे. वाळू उपशाकडे संबंधित गेवराईचे डीवायएसपी नीरज राजगुरू यांची डोळेझाक सुरू आहे.

गेल्या काही दिवसांपासून गेवराई तालुक्यात वाळू उपशाला चांगलेच उधाण आले आहे. कोणालाही न जुमानता हायवा, डंपर, ट्रॅक्टरच्या माध्यमातून वाळू माफियांकडून दिवसाढवळ्या शेकडो ब्रास वाळूची वाहतूक करण्यात येत आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना महसूल विभाग व पोलिस यंत्रणा मात्र गप्प आहेत. त्यामुळे गेवराई तालुक्यातील नदीपात्रातून शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक होत आहे. विशेष म्हणजे, वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरांचे तसेच हायवांचे नंबर प्लेट काढून टाकण्यात आलेले आहेत. अवैध वाळू माफियांना कोणाचीच भीती राहिलेली नाही.

ग्रामीण भागात भरधाव धावणाऱ्या ट्रॅक्टरांना कोणी हटकल्यास मुजोरीची भाषा वापरतात. पोलिसात तक्रार देण्याची धमकी दिली तर आम्ही हप्ते देतो. त्यामुळे आमचे कोणी काही बिघडवू शकत नाही, अशी मुजोरीची भाषा वापरतात. सुरू असलेल्या या वाळू माफिया व ओव्हरलोड वाहतुकीमुळे परिसरातील चांगल्या रस्त्यांची पुरती वाट लागली आहे.

वाळू माफिया जोमात असताना महसूल विभाग आणि पोलिस यंत्रणा कोमात गेल्याचे तस्करांना आळा घालणारा तरी कोण? असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे. पर्यावरणाचे नुकसान करण्यासह शासनाच्या महसुलावर दरोडा टाकणाऱ्या वाळू माफियांना जिल्हाधिकारी दीपा मुधोळ व जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी आवर घालावा, अशी मागणी गोदाकाठच्या परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

### अधिकाऱ्यांच्या रंगीत संगीत पाट्यां..

स्थानिक पोलीस, महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि वाळू तस्कर यांचे घनिष्ठ संबंध आहेत. याच संबंधातून गेवराई तालुक्यातून अवैधरित्या बेसुमार वाळू उपसा केला जात आहे. या माधमातून मोठी माया या सर्वांनी जमा केली आहे. हे सर्व रंगीत संगीत पाट्यां करीत असतात, अशी जोरदार नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे.

# बीडमध्ये संदीप क्षीरसागर यांच्या कारसमोर मुंडे समर्थक आक्रमक!

## घोषणाबाजी करत क्षीरसागर यांना गावातून बाहेर काढले

बीड : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर अजित पवार गट व शरद पवार गट समोरासमोर आल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. आज बीडमध्ये अशीच एक घटना घडली ज्यात अजित पवार गटाचे धनंजय मुंडे व भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांचे समर्थक आक्रमक झालेले पाहायला मिळाले. शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांची कार येताच मुंडे समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली आणि त्यांना गावातून बाहेर काढले. हिंगणी (खुर्द) गावामध्ये ही घटना घडली आहे. याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आमदार संदीप क्षीरसागर यांना मुंडे समर्थकांच्या



घोषणाबाजीचा सामना करावा लागला. बीडच्या हिंगणी (खुर्द) गावात संदीप क्षीरसागर यांची कार येताच मुंडे समर्थक आक्रमक झाले आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी गेली. 'पंकजाताई अंगार है, बाकी सब भंगार है!', 'महाराष्ट्राचा एकच ढाण्या वाघ धनंजय मुंडे साहेब' अशा प्रकारच्या घोषणा मुंडे समर्थकांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या कारसमोर दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने मुंडे समर्थक एकत्र आले होते. यावेळी घोषणाबाजी करत मुंडे समर्थकांनी संदीप क्षीरसागर यांना गावाबाहेर काढले.

आमदार संदीप क्षीरसागर हे बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद सर्कलमध्ये काल रात्री साडेआठच्या दरम्यान गावाला भेट देत दौरा करण्यासाठी आले होते. यादरम्यान ते हिंगणी (खुर्द) येथे आले असता त्यांना मुंडे समर्थकांनी विरोध दर्शवला. यावेळी पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केल्या. या घोषणा देत त्यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांना विरोध दर्शवत घोषणाबाजी केली.

## नोंदी निघालेल्या मुस्लिमांनाही कुणबीतून आरक्षण द्या

# त्यांच्यावरही अन्याय नको, आरक्षण कसे मिळत नाही, तेच बघतो, जरांगेंचा हल्लाबोल

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

सरकारी नोंदी निघालेल्या मुस्लिमांना सुद्धा कुणबीतून आरक्षण द्या. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करा, अन्यथा विधानसभेला गुलाल रुसेल असा आक्रमक इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला दिला आहे. आम्हाला कायद्याचा आधार आहे. आमच्या कुणबी म्हणून नोंदी सापडल्या आहेत. मी पुरावाही द्यायला तयार आहे असेही त्यांनी ठणकावून सांगितले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.



### मुस्लिमांवरही अन्याय नको व्हायला

पुढे मनोज जरांगे म्हणाले की, ''तुम्ही गुलालाचा अपमान करू नका. कोणाच्याही दबाबावाला बळी पडू नका. कुणबी म्हणून सरकारी नोंदी या मुस्लिम समाजाच्या देखील निघाल्या आहेत. त्यांच्या नोंदी सरकारी निघाल्या तर मुस्लिमांना सुद्धा ओबीसीमधून आरक्षण दिले पाहिजे. त्यांच्यावर देखील अन्याय झाला नाही पाहिजे. पाशा पटेलांची देखील कुणबी म्हणून नोंद निघाली आहे. मी सर्व पुरावे द्यायला तयार आहे. मुस्लिमांची सरकार दरबारी कुणबी नोंद निघाली असेल तर राज्यातील सर्व मुस्लिमांनाही ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिलं पाहिजे, अशी मागणी जरांगे यांनी केली. आरक्षण कसं मिळत नाही, तेच मी बघतो'', असे जरांगे म्हणाले.

### सर्वांचेच आरक्षण रद्द करा

तसेच ज्यांच्या सरकारी नोंदी सापडल्या आहेत, त्यांना ओबीसीमधून आरक्षण देणार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगावे असे जरांगे पाटील म्हणाले. आम्हाला आरक्षण द्या, आम्हाला राजकारणाचे देणेघेणं नाही. बेकायदेशीर प्रमाणपत्रे वाटले ते कायदेशीर मानले जाते. त्यापेक्षा सर्वांचेच आरक्षण रद्द करा असे जरांगे म्हणाले.

# चोरांचा डाव फसला एटीएम मशीन चोरली मात्र पोलीस मार्गावर असल्याने मशीन सोडून काढला पळ

## एटीएम मशीन मध्ये होते २१ लाख

किल्ले धारूर । प्रतिनिधि

धारूर तालुक्यातील तेलगाव रोड लगत असणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या समोरील एटीएम मशीन शनिवारी पहाटे चोरट्यांनी एका पिकप च्या आधारे पळवली होती. लागलीच पाठलाग करून धारूर पोलिसांनी केला असता एटीएम चोरण्यासाठी वापरलेले पिकप एटीएम मशीन व त्यात असलेली २१ लाख १३ हजार ७०० रुपयांची रोकड जप्त करण्यात धारूर पोलिसांसह माजलगाव ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. मात्र अद्याप एकही आरोपी पकडण्यात आलेला नाही.

धारूर शहरात शेलगाव रोडवर असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या बाहेर एका बंद खोलीत असलेले एटीएम मशीन दि २२ शनिवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी बंद खोलीचे शटर चे कुलूप तोडून पोलीस प्रवेश करून एका पिकप च्या आधारे पळवून नेले होते. पहाटेनंतर एटीएम मध्ये छेडछाड झाल्याचं




लक्षात आल्याने बँक यंत्रणा सतर्क झाली आणि पोलिसांशी संपर्क केला असता सदरील एटीएम चोरी झाल्याचे लक्षात आले. यानंतर बँकेचे अधिकारी आणि पोलीस यंत्रणा सतर्क झाली आणि धारूर पोलिसांनी चोरट्यांच्या तपासाला सुरुवात केली. असता माजलगाव तालुक्यातील जायकोचीवाडी येथे एटीएम चोरीमध्ये वापरलेले पिकप सोडून चोरट्यांनी पळ काढल्याचे पोलिसांना समजले. परंतु तिथून काही अंतरावरच चोरट्यांनी एटीएम घेऊन जात त्याची लॉकर तोडण्याच्या दृष्टीने छेडछाड केली परंतु लॉकर तोडण्यात चोरट्यांना यश आलं नसल्याने आणि एटीएम मशीनला जीपीआरएस सिस्टीम कार्यान्वित असल्याने पोलिसांना सहज तिथपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. पोलिसांनी पिकप आणि चोरी झालेले एटीएम दोन्हीही जायकोची वाडी येथून ताब्यात घेतले आहे एटीएम मशीन बँक अधिकाऱ्याच्या सक्षम उघडल्या नंतर यात २१ लाख १३ हजार ७०० रुपय मिळून आले आहेत या तपासात धारूर पोलिसांना माजलगाव पोलिसांची मोठी मदत झाली. चोरीसाठी वापरलेले पिकप आणि चोरी झालेले एटीएम दोन्हीचा तपास लागला असला तरी अद्याप पर्यंत पोलीस चोरट्यांपर्यंत पोहोचू शकलेले नाहीत. धारूर तालुक्यात मागील अनेक दिवसापासून वेगवेगळ्या चोऱ्यांमध्ये वाढ झालेली आहे यात काही भुरट्या तर काही नियोजित जबरी चोरांचे प्रकार दिसून येत असल्याने पोलिसांचा वचक राहिला नसल्याने धारूर तालुक्यात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे पोलिसांनी पोलीस यंत्रणा सतर्क करून वाढत असलेल्या चोऱ्यांचे प्रमाण थांबवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं असल्याचं सामान्य नागरिकांमधून बोलले जात आहे. एटीएम चोरीचा तपास करण्यासाठी घालून पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, श्री वखरे यांच्यासह माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक विजय सिंह जॉनवर आणि दोन्ही बाजूच्या पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांचे विशेष परिश्रम घेतले.

# बीडमध्ये गेवराई येथील बाळासाहेब सोलंकर या तरुणांचे लागले बॅनर

## प्रस्थापित यांच्या विरोधात गेवराई विधानसभा निवडणूक लढविणार, अशा अशाचे लागले बॅनर, या बॅनरने गेवराई तालुक्यात राजकीय खळबळ

बीड । प्रतिनिधी

वास्तविक पाहता गेवराई हा ओबीसी बहुल मतदार संघ आहे. परंतु गेली अनेक वर्ष इथल्या प्रस्थापितांना ह्या समाजाच्या भोळ्या ,भाबड्या, अडाणीपणाचा फायदा घेऊन गेवराईची सत्ता लुबडली आहे. परंतु आता ह्या आठरापगड जातीमध्ये अनेक मुलं शिक्षण घेऊन उच्च पदापर्यंत व पदावर जाऊन त्यांच्यामध्ये कायद्याचं, व्यवस्थेचा शिक्षण आल्यामुळे आता ही माणसं जागी झाली . आपल्या हक्काचं आपल्या वाट्याचं कोणीतरी आपल्याला वेड गबाळ समजून लुबाडत आहे. हे इथल्या आठरापगड जातीच्या लोकांच्या लक्षामध्ये आलं आणि येणारी गेवराई विधानसभा २०२४ ची निवडणूक ह्या अठरापगड जाती मधली पोरं समोर येऊन मोठ्या ताकतीने मोठ्या फरकानं ही निवडणूक लढवून जिंकून येणार हा विश्वास त्यांच्यामध्ये आला. कारण हा




गेवराई मतदार संघात मोठ्या प्रमाणत ओबीसी समाज आहे.

गेवराई तालुक्यातील शहाजनपूर येथील युवक बाळासाहेब सोलंकर या युवकांनी, गेवराई विधानसभा निवडणूक लढविणार व प्रस्थापितांच्या विरोधात निवडणूक जिंकुन देखिल येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले, या युवकांनी बीडमध्ये बॅनर लावलेले आहेत या बॅनरने जिल्हाभरात खळबळ,

# पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभारामुळे रस्त्याची दुरावस्था

## शेळके वस्तीवरील ग्रामस्थ अडचणीत :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव गावातील शेळके वस्तीवरील रस्ता ग्रामस्थांनी स्वखर्चाने केलेला आहे. उन्हाळ्यात पवनचक्की प्रकल्प धारकांनी याच वस्ती रस्त्यावरून जड वाहनाने साहीत्याची वाहतूक केल्याने रस्ता खचला आहे.सध्या पावसाळ्यात याठिकाणी मोठ्ठ मोठे खड्डे पडल्यामुळे गुडघाभर पाणी साचत असुन चिखलातुन ये जा करताना गावात जाण्यासाठी शाळकरी मुले, भाजीपाला उत्पादक, महिला वृद्ध यांना दवाखाना, बाजारहाट तसेच शेतक-यांना खत बि - बियाणे वाहतूक करण्यासाठी अडचण निर्माण झाली आहे. पवनचक्की अधिकारी फोन सुद्धा उचलत नाहीत.त्यामुळे आमच्या रस्त्याची तातडीने सोय करण्यात यावी.अशी मागणी किसन शेळके,आप्पासाहेब शेळके,भरत शेळके, दामोदर जोगदंड,



बाबासाहेब जोगदंड, अतुल शेळके, श्रीराम शेळके, राजेंद्र शेळके,शरद शेळके मोहन शेळके यांनी केली आहे.

पवनचक्की धारकांनी त्यांच्या वाहनांच्या सोयीसाठी सुरक्षित ठिकाणी असणारा विद्युत पोल य वाहतुकीच्या मार्गावरील बांधावर उभा केला असुन पावसाळ्यात वाहत्या पाण्याने बांधाची माती वाहून गेली असुन वादळी वाऱ्यासह पावसाने पोल पडण्याची शक्यता असुन भविष्यात दुर्घटना घडुन पशु अथवा माणसाचा बळी गेल्यास जबाबदार कोण?? असा प्रश्न मोहन शेळके यांनी उपस्थित केला आहे.

बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरू असुन पवनचक्की प्रकल्प उभारताना स्थानिक दलाला मार्फत अडाणी शेतकऱ्यांची दिशाभूल करून पवनचक्की प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित करताना भुलथापा देत नियमांची पायमल्ली करून प्रकल्प उभारण्यात येत असल्याच्या लेखी तक्रारींचे प्रमाण वाढले असुन शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर सुद्धा महसूल व पोलीस प्रशासन अन्याय ग्रस्त शेतकऱ्यांच्या बाजूने ऊभे राहण्याऐवजी कंपनीची पाठराखण करत कंपनीचीच बाजु घेऊन शेतकऱ्यांना दमदाटी करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. पुढारी आणि महसूल अधिकारी यांच्या संगनमताने पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरू आहे.

# मृग नक्षत्र आणि मृग किडा म्हणजे बळीराजाला पेरणी करण्याचे संकेत देणारं समीकरण !

भारतात पावसाच्या आगमनाची बातमी भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलीये. वैज्ञानिक निकषांची पूर्तता झाली की, पाऊस कधी येणार? हे जाहीर केलं जातं. पण जसं वैज्ञानिक निकष असतात तसेच काही नैसर्गिक निकष देखील असतात जे पूर्ण झाले की पावसाच्या आगमनाची सर्वांना इच्छा असते.

यामध्ये सगळ्यात महत्वाचा फॅक्टर असतो 'मृग नक्षत्र' आणि 'मृग किडा'

सूर्य या साधारण २७ नक्षत्रांतून वर्षभरात प्रवास करतो. सूर्याचा हा प्रवास आणि त्यावेळी भारतात असणारे ऋतू यांचा सहसंबंध असतो, हे आपल्या पूर्वजांच्या लक्षात आला. २७ नक्षत्रांपैकी मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, अश्लेषा, मघा, पूर्वा फाल्गुनी, उत्तरा फाल्गुन, हस्त या ९ नक्षत्रात जेव्हा सूर्य असतो तेव्हा पावसाळा असतो

यापैकी पहिल्या मृगशीर्ष नक्षत्रात ७ ते ८ जूनला सूर्य प्रवेश करतो. आणि त्यावेळी भारतात मान्सूनचे आगमन होत



असतं. ८ जून ते २१ जून सूर्य या नक्षत्रात असतो.'मृग' हे विशेष देखणं नक्षत्र. हरिणाचे चार पाय, त्याच्या पोटात शिरलेला बाण आणि लगतच असलेला तेजस्वी व्याध तारा, असा भासणारा हा तारकासमूह मार्गशीर्ष महिन्यात पूर्ण रात्रभर आकाशात दिसतो. मात्र जूनमध्ये आकाशात मृग नक्षत्र दिसतच नाही, कारण सूर्याच्या सान्निध्यात त्याचं तेज लुप्त होत असतं.ग्रामीण भागात मृग नक्षत्र म्हणजे शेतीची सुरुवात! बळीराजा पेरणीला सुरुवात करत असतो. मात्र पेरणीला नक्की सुरुवात केव्हा करायची, हे समजण्यासाठी एक महत्वाचा घटक कारणीभूत ठरतो. तो म्हणजे

आपल्या संस्कृतीत निसर्गाच्या प्रत्येक विशेषाला पूजेचा मान असतो. नाग पंचमी, बैल पोळा, वटसावित्री, हे सगळेच दिवस मान्सूनच्या मौसमातच येतात. हे रेशमी लाल किडे पण तेव्हाच दिसतात. हे किडे भारतातल्या जैव विविधतेचा भाग आहेत आणि हा किडा दिसला की पाऊस पडणार अशी धारणा ग्रामीण भागातील लोकांची आहे. त्यामुळेच हा किडा दिसल्यानंतर ग्रामीण भागातील लोक त्याला हळद-कुंकू वाहत त्याची पूजा करतात.



मोठ्या किड्यांना साधारणपणे आठ पाय असतात. तर लहान किडे तरुण होत नाहीत तोपर्यंत यांना सहा पायच असतात. पुढे तरुण झाल्यानंतर त्यांच्या शरीरात होणारे बदलांसोबत हे जास्तीचे दोन पाय दिसू लागतात. पन यांना कावळा, मैना, चिमणी अशा पक्ष्यांपासून जपून राहावे लागतं. या किड्यांचं आयुष्यमान तसं खूप कमी कालावधीचंच असतं. साधारणपणे दोन ते तीन महिन्यानंतर हे किडे दिसत नाहीत.

वैज्ञानिक दृष्ट्या देखील या किड्याला खूप महत्त्व प्राप्त झालेलं आहे. या किड्यांमध्ये हजारो वेगवेगळ्या प्रजाती आहेत, ज्या संपूर्ण जगभर सापडतात. विशेषतः कॅनडा ते आफ्रिका इथल्या भूभागांमध्ये हे किडे मोठ्या प्रमाणात दिसतात. विविध भूभागांनुसार यांच्या आकारातदेखील फरक पडत असतो. या प्रकारचा सापडलेला सर्वात लहान किडा दोन सेंटीमीटर लांबीचा आहे.

लेखक :- रविंद्र लक्ष्मण काटकर
( जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, अंबड
संपर्क :- ८३०८१५२७०५ )

# प्रसिद्ध व्यापारी मनोज अग्रवाल यांना मातृशोक

## गीतादेवी यांचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन; मरणोपरांत केले नेत्रदान!

बीड । प्रतिनिधी

शहरातील अग्रवाल मेडिकल तथा सॅमसंग मोबाईल शॉपीचे संचालक मनोज अग्रवाल यांच्या मातोश्री गीतादेवी गणपतलालजी अग्रवाल यांना दिनांक २२ जून २०२४ शनिवार रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यातच त्यांचे निधन झाले. मृत्यू समयी त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार मरणोपरांत त्यांचे डोळे दान करण्यात आले. जिल्हा रुग्णालयाचे नेत्र शल्य चिकित्सा तज्ञ डॉ. राधेश्याम जाजू यांनी गीता देवी यांचे डोळे संकलित केले. गीतादेवी आज या जगातून गेल्या असल्या तरी त्यांच्या डोळ्यांद्वारे दोन नेत्रहीन लोक हे जग पाहतील.



गीतादेवी यांनी पती गणपतलालजी अग्रवाल यांच्यासोबत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या संसाराचा गाळा रेटला. सर्व मुलांना उच्च शिक्षण दिले. त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व दयाळू होता. त्यांचे व त्यांचे पती गणपतलालजी अग्रवाल यांचे चांगले गुण त्यांच्या सर्व मुलांमध्ये आले आहेत. त्यातही सर्वात लहान पुत्र मनोज अग्रवाल यांनी तर अक्षरशः शून्यातून विश्व निर्माण केले आहे. आजघडीला मनोज अग्रवाल हे फक्त बीड शहरातच नाही तर संपूर्ण बीड जिल्ह्यात एक सुहृदयी व्यक्तीमत्व यशस्वी व सुप्रसिद्ध व्यापारी म्हणून ओळखले जातात. आपल्या आई-वडिलांसारखेच तेही सर्वसामान्य गोरगरिबांच्या अडीअडचणीत धावून जातात. असे हे मनोज अग्रवाल आणि त्यांचे सर्व बंधू आता आईच्या मायेला पारखे झाले आहेत. गीतादेवी यांच्या पार्थिवावर रविवार दिनांक २३ जून २०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता मोंढा रोडवरील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. गीतादेवी यांच्या मागे पती गणपतलालजी अग्रवाल, एक मुलगी, प्रमोद, अजय, विजय आणि मनोज ही चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अग्रवाल कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक परिवार सहभागी आहे.

### हिंगणी बुद्रुक जि प शाळेतील शिक्षकाच्या रिक्त जागा भरण्याची मागणी

किल्ले धारूर । प्रतिनिधि

धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथील जि प शाळांमध्ये चार जागा रिक्त असून यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे या रिक्त जागा भराव्यात अशी मागणी सरपंच योगेश सोळंके यांनी ही मागणी केली आहे धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथील जि प शाळेमध्ये सध्या पदवीधरांच्या तीन जागा व एक डी एड शिक्षकाची जागा रिक्त असून या जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणीक

नुकसान होत आहे. यामुळे हे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तात्काळ येथील रिक्त जागा भराव्यात अशी मागणी येथील सरपंच योगेश सोळंके यांनी शिक्षण विभागास निवेदनाद्वारे केली आहे एक जुलै च्या त्या रिक्त जागा न भरल्यास पालकासह एकत्रीत अंदोलन छेडण्याचा इशारा शिक्षण विभागास निवेदना द्वारे देण्यात आला आहे

# स्वाराती रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांच्या खाजगी प्रॅक्टिस बंद करा -अभिजीत लोमटे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वाराती रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांचे खाजगी प्रॅक्टिस बंद करण्यात यावी अन्यथा आमरण उपोषणास बसण्याचा इशारा अंबाजोगाई डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी ईमेलद्वारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांना दिला आहे. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे गोरगरिबांना जीवन संजीवनी म्हणून लाभलेले वरदान आहे



मात्र मागील काही वर्षापासून स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात शासकीय सवेत असणारे डॉक्टरानी त्यांच्या पत्नी नातेवाईकांच्या नावावर आलिशान खाजगी दवाखाने चालू करत त्या दवाखान्यात स्वतः रुग्णास उपचार देतात. त्यामुळे स्वाराती रुग्णालयात येणाऱ्या रुग्णास योग्य व वेळेत उपचार मिळत नाही येथे कार्यरत डॉक्टर रुग्णास त्यांच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी येण्यास सांगतात या खाजगी रुग्णालयात त्यांची आर्थिक पिळवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे विशेषतः स्वारातीत फक्त हजेरी लावून खाजगी रुग्णालयात प्रॅक्टिस करण्यात ते जास्त व्यस्त आहेत. याशिवाय स्वा रा ती रुग्णालयातील अनेक जनाचे बाहेरगावी खाजगी रुग्णालय असल्यामुळे ते फक्त पगारी पुरतेच येतात अश्या डॉक्टर वर निलंबनाची कारवाई करण्यात यावी खाजगी रुग्णालय चालवणाऱ्या डॉक्टर वर कारवाई झाली नाही तर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणास बसण्याचा इशारा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांना ईमेल निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी प्रकरणी

## बाळराजे आवरे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना जामीन मंजूर

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर येथे दिनांक १४ जून रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा केल्याप्रकरणी छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवळे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय केज यांनी जामीन मंजूर केला.

किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा १४ जून रोजी पहाटे छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानच्या अध्यक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांनी उभा केला होता याप्रकरणी त्यांना धारूर पोलिसांनी अटक केली होती त्यांना अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय केज यांनी पंचवीस हजार रुपये जात मुसलक्यावर जामीन मंजूर केला या कामी न्यायालयीन प्रक्रियेमध्ये धारूर न्यायालयातील विधीज्ञ ॲड. परमेश्वर शिनगारे ॲड. अमोल साखरे ॲड. सुरज नखाते ॲड. मोहन भोसले ॲड. राज नाईकवाडे ॲड. शादाब शेख ऍड. युवराज फुन्ने ॲड. रवी सावंत ॲड. संस्कार शिनगारे, ॲड. दादासाहेब मायकर यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

# मराठा समाज मागासलेला नाही:सरकारला वेठीस धरणे, दादागिरी करणे जमणार नाही, लक्ष्मण हाके यांचे प्रत्युत्तर

छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी

आरक्षण हे समतेचे तत्व आहे. शिवाजी महाराज सगळ्यांना मावळा म्हणायचे. कुणाला जातीने हाक मारली नाही, आम्हाला आरक्षण वाचवू द्या, आमची लोक विखुरलेली आहेत. आम्हाला पोट भरायचा प्रश्न आहे. तो आमदारकीला कशाला उभा राहिल? आम्ही लोकचळवळ उभी करतोय, असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.

दरम्यान लक्ष्मण हाके पुढे बोलताना म्हणाले की, संविधानांच्या तरतुदीत मराठा समाज सामाजिक मागासलेपण सिद्ध करु शकला नाही. कोर्टाने सुद्धा ही बाब सांगितले ६०० पानांचे जजमेंट दिले, याबाबीवर कोणीही बोलायला तयार नाही. एखादा आंदोलन करतो, झुंडशाहीच्या जोरावर सगळ्यांना वेठीस धरतो, भुजबळांना संपवतो, विधानसभेला २८८ जागांवर लढवीन असे इशारा देतो,



सरकारला वेठीस धरतो अशी दादागिरी चालणार नाही सरकारचा मला राग येतो की ते मनोरंजन करतात? त्यांनी फक्टॅस दाखवावेत जरांगेंना असा थेट सल्ला हाकेंनी दिला आहे.

लक्ष्मण हाके म्हणाले की, आजपर्यंत आम्ही खूप सहन केले. भटक्या विमुक्त जातीजमातीला आव्हान आहेत, केंद्रात आपण ओबीसी आहोत. केंद्रात व्हिजेएनटी आरक्षण नाही. जरांगे यांनी बुद्धिभेद करू नये, तुम्ही समोर चर्चेला या असे हाकेंनी म्हटले आहे. मूळात ओबीसी, मंडल आयोग तो कधी लागू झाला, पहिल्या किती जाती होत्या, त्यात समावेश आणि वगळण्यासाठी राज्य मागासवर्गीय आयोग आहे. त्या जाती कशा घातल्या, अचानक नोंदी आल्या वैगेरे हे काहीही बोलतात. महाराष्ट्रात ज्याला घटनात्मक अधिकार आहे अशा राज्य मागासवर्गीय आयोगाने वेळोवेळी अभ्यास केला, त्या आयोगाच्या माध्यमातून या जातींचा समावेश केला जातो.

# योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा राजकिशोर मोदी यांच्या वतीने सन्मान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी त्यांचे काही निवडक सहकारी जसेकी कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर, शिवाजीराव चौसाळकर, केशवराव कुर्डूकर, सदाशिवराव जोशी यांनी एकत्र येऊन इ.स. १९१७-१८ मध्ये पहिली ते सातवी पर्यंत प्राथमिक शाळा सुरु केली नंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९३६ साली हायस्कूल सुरू करून संस्था वाढविण्याचे काम केले.त्यांनी सुरु केलेल्या श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सन्मान व सत्कार बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्यालयात जाऊन त्यांचा सन्मान व सत्कार केला. यावेळी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, प्रा वसंत चव्हाण, कार्यकारी संचालक संकेत मोदी प्रा डॉ गणेश पिंगळे, तंत्र निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य रमण देशपांडे उपस्थित होते.

पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी राजकिशोर मोदी यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव केला. स्वामीजींच्या पावन स्मृती आजही या संस्थेला प्रवृत्त करतांना दिसून येतात. योगेश्वरी शिक्षण संस्थेने आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडविले आहेत. त्यातील अनेक विद्यार्थी देशात अनेक ठिकाणी मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत याचा या संस्थेला सार्थ अभिमानच असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. आपणही या संस्थेच्या उभारणीसाठी सदैव तत्पर राहु असे आश्वासन यावेळी मोदी यांनी दिले.श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ व राजकिशोर मोदी यांच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आलेल्या संचालक मंडळात संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष अँड जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, सहसचिव प्रा.भीमाशंकर शेटे, सचिव कमलाकर चौसाळकर, जेष्ठ सल्लागार प्रा. नारायण गोळेगावकर, प्रा. माणिक लोमटे, संचालक प्रा. अभिजीत लोहीया, डॉ. जयश्री मोरेगावकर , लंकेश वैदय ,पाशु करीम सय्यद, प्रताप पवार ,अंगदराव कऱ्हाड, रमण सोनवळकर,अँड कल्याणी विर्धे, यांचा समावेश होता.

संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष चंद्रशेखर बरदापुरकर यांनी आम्ही सर्व संचालक मंडळ हे अतिशय जबाबदारीने कार्य करून संस्थेची गुणवत्ता वाढवण्यासाठी मेहनत घेऊन महाविद्यालयात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा विकास करू असे सांगितले. त्याचबरोबर आम्हा सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व आमच्या संचालक मंडळाकडून व्यक्त केली असलेली अपेक्षा पुर्ण करण्यासाठी कटिबद्ध असू असे आश्वाशीत केले.

संस्थेचे संचालक गणपत व्यास यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी संस्था चालवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. मागील वीस ते पंचवीस वर्षांपासून संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कायापालट केला असल्याचे आवर्जून सांगितले. मोडकळीस आलेल्या महात्मा फुले वसतिगृहाची अतिशय अद्यावत अशी वास्तू उभा केली आहे. ज्यामध्ये ग्रामीण भागातील अनेक गरीब व होतकरू विद्यार्थी राहून आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. त्याचबरोबर संपूर्ण महाविद्यालयाची इमारत देखील अतिशय जीर्ण होऊन मोडकळीस आली होती ती इमारत नव्याने बांधून तयार केल्याचे व्यास यांनी नमूद केले.



महाविद्यालयाच्या या उभारणीसाठी महाविद्यालयाच्या अनेक माजी विद्यार्थ्यांचे आर्थिक पाठबळ लाभल्याचे आवर्जून उल्लेखित केले. तसेच यापुढेही कालानुरूप महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा कशा प्रकारे वाढविता येईल याचा कसोशीने सर्व संचालक मंडळाच्या वतीने केला जात असल्याचे गणपत व्यास यांनी सांगितले. या सन्मान समारंभाचे सूत्र संचलन शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी केले तर आभार प्रा.गणेश पिंगळे यांनी व्यक्त केले.



## केज तालुक्यातील डोणगाव फाटा व पिंपळगाव फाटा येथे ओबीसी आरक्षण बचावा साठी एक तास केला रास्ता रोको

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील डोणगाव फाटा येथे रस्त्यावर टायर पेटवून देऊन एक तास रस्ता रोको करण्यात आला तर दुसऱ्या ठिकाणी पिंपळगाव फाटा येथे देखील एक तास रस्ता रोको करण्यात आलेल्या दोन्हीही ठिकाणी ओबीसी आरक्षण बचावासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, वडीगोद्री येथे ओबीसी आरक्षण बचावासाठी गेल्या अनेक दिवसांपासून लक्ष्मण हाके व नवनाथ आबा वाघमारे यांनी उपोषण चालू केले आहे.

त्या अनुषंगाने अनेक ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे त्याचाच भाग म्हणून दिनांक २२ जून २०२४ रोजी केज तालुक्यातील डोणगाव फाटा येथे ओबीसी समाज बांधव एकत्र येत रस्त्यावर टायर पेटवून देऊन घोषणाबाजी करत एक तास रस्ता रोको करण्यात आले तर केज तालुक्यातील पिंपळगाव फाटा येथे देखील एक तास ओबीसी समाज बांधवांनी रस्ता रोको केला आहे.यावेळी दोन्हीही ठिकाणी ओबीसी समाज बांधव मोठ्या प्रमाणात या रास्ता रोको मध्ये सहभागी होते.या दोन्ही रस्ता रोको मध्ये पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# बीड शहरात आरोग्य क्रांती घडवून आणणार - योगा ट्रेनर जितेंद्र बोरा

बीड ।प्रतिनिधी

मागील २६ वर्षापासून अविरतपणे मोफत सेवा देणारे बीड शहरातील दीपमाळ योगा ग्रुप ची बालाजी मंदिर येथे सुरुवात करण्यात आली होती. मागील दहा वर्षापासून खंडोबा मंदिराच्या निसर्गरम्य परिसरामध्ये ब्रह्म मुहूर्तावर दररोज सकाळी साडेपाच ते सात या वेळेत योग वर्ग घेतला जातो. दिनांक २१ जून जागतिक योग दिनाचे औचित्य साधून दीपमाळ परिसरात अभूतपूर्व असे योगा शिबिर घेण्यात आले. यामध्ये प्रास्ताविक व योग संदर्भात माहिती मा.जितेंद्रजी बोरा सर यांच्याकडून देण्यात आली. योगाचे प्रात्यक्षिक मा.प्रशांतजी बोरा सर तसेच मधुमेह या आजारावर शास्त्रोक्त माहिती डॉ.राजेंद्र जी सारडा सर यांच्याकडून देण्यात आली सूर्यनमस्कार बीज मंत्राद्वारे प्रात्यक्षिक विष्णुदासजी बीयाणी यांच्याकडून करण्यात आले.या शिबिरात शहरातील नागरिकांनी उस्फुर्त असा प्रतिसाद दिला. या शिबिरात शहरातील प्रतिष्ठित डॉक्टर्स, वकील ,इंजिनियर्स ,सीए आणि व्यापारी वर्ग तसेच सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते. यात प्रामुख्याने पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज साहेब, दैनिक लोकाशाचे संपादक विजयराजी बंब, गौतम खटोड, गोपाल कासट, डॉ.राहूल जाजू, डॉ.शिवप्रसाद जाजू ,अशोक शेटे , जवाहरलाल सारडा, जयसिंग मामा चूंगडे



, इंजिनिअर राहुल बोरा, डॉ. वरद चरखा , मारुतीराव नाईकवाडे, मदन दुग्गड इत्यादी उपस्थित होते.या शिबिरास यशस्वी बनवण्यासाठी योगशिक्षक व सदस्य दीपक सोळंकी ,आनंद चरखा, शीरढोणे सर, नागेश मिटकरी, महादेव गाढवे, अरुण बागडे, उत्तम राठोड, पप्पू मराठे, उपरे, झंवर, शुभम सारडा, व्यवहारे, मानकुस,अनिल मिटकरी, सोनटक्के, गोरे, राजू फटाले, भगवान फटाले, अक्षय पवळ, रितेश बागमार, इ. सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमानंतर अल्पोपहार देण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय योग दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहामध्ये संपन्न

बीड ।प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासन, प्राणायाम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये उत्साहामध्ये सामुदायिक पद्धतीने संपन्न झाले. या कार्यक्रमाच प्रसंगी या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या प्रसंगी पतंजली ऋषी रामदेव बाबा यांचे योगा संदर्भातील योगदान योगासनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रतिपादन करून मार्गदर्शन केले. याप्रसंगी या विद्यालयाचे शिक्षक आर.बी. घुले, एस.बी. मेश्राम आणि मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे संचलन एस.बी.मेश्राम प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. याप्रसंगी यु.बी. पवळ, यशवंत वस्तीगृहाचे अधीक्षक यु.बी. टाळके, डी.जी. हजारे एस.एस. गायकवाड, भारत कोळेकर, एल.बी. हजारे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




बीड- भारतीय बौद्ध महासभा शाखा बीड यांच्या वतिने मध्यवर्ती कार्यालय येथे संत कबीर जयंती निमित्ताने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी अभिवादन करताना जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, कोषाध्यक्ष अमरसिंह ढाका, बौद्धाचार्य सदाशिव पट्टेकर, यशवंत कदम,संदेश डोळस आदी उपस्थित होते.

## सेवेकडे तन, भगवंताकडे मन आणि अन्नदानाकडे धन लावणारे संत माऊली चाकरवाडीकर होते - ह. भ. प. रामकृष्ण रंधवे बापु

आष्टी ।प्रतिनिधी

अज्ञानाचे आवरण घालविण्यासाठी संत येतात. सामान्य कर्तव्य म्हणजे स्वाभिमानाने जगण्यासाठी पैशाची प्राप्ती, विशेष कर्तव्य पुण्यप्राप्ती आणि पैशापेक्षा पुण्य श्रेष्ठ आहे. ज्यांच्या अंतकरणात सतत भगवंताची आठवण असते त्यांच्याजवळच दया असते. तन, मन, धन या तिन्ही गोष्टीचा जो कोणी सदुपयोग करीन त्याचा इतिहास होतो. सेवेकडे तन, भगवंताकडे मन आणि अन्नदानाकडे धन लावणारे संत माऊली चाकरवाडीकर होते असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार ह. भ. प. रामकृष्ण रंधवे बापु यांनी केले.

आष्टी येथील माऊली नगरात २० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे २४ व्या पुण्यतिथीनिमित्त व संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या सप्तशत्तकोत्तर सुवर्ण महोत्सवी




जन्मोत्सव सोहळ्या निमित्त अ. भा. वारकरी मंडळाचे प्रेरणाने ज्ञानेश्वरी पारायण, अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरु आहे. या सप्ताहात कीर्तन सेवेत रामकृष्ण रंधवे बापु बोलत होते.

यावेळी ह. भ. प. निवृत्तीदादा बोडखे, ह. भ. प. श्रीहरि पुरी महाराज, ह. भ. प. आदिनाथ महाराज दानवे, राजेंद्र धोंडे, आदिनाथ सानप, बलभीमराव सुंबरे, देवीदास चाळक, दिनकरराव तांदळे, गोविंद महाराज पवार,बाबासाहेब शिंदे, हनुमान महाराज येवले, अनिल महाराज गरुड, देविदास बर्डे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सरपंच परिवंत गायकवाड, अशोक बळे, बबन बळे, प्रा. सुभाष रासकर, ओम महाराज नन्नवरे, तुकाराम महाराज भोसले, रविंद्र तवले, दत्तात्रय निंबाळकर, प्राचार्य के. बी. खाडे, ह. भ. प. अशोक डोके महाराज, नानासाहेब तवले, हौसराव आजबे, अवधूत आवारे, ज्ञानेश्वरी केरुळकर, भाऊसाहेब कोकणे, तुळशीराम चटाले, पिराजी तवले, डोमकावळे महाराज उपस्थित होते.

यावेळी ह. भ. प. रामकृष्ण रंधवे बापू पुढे म्हणाले की, समाजात मानव, संत, भगवंत हा तीन वर्ग आहेत. जीव दशेतील मानव हा सुखाच्या, आनंदाच्या शोधात आहे. संत जीवनात सदानंद असतो. भगवंत हा सचिदानंद स्वरुप आहे. देव म्हणजे आनंद आहे. देवाचे दुसरे नाव आनंद. देव हा व्यक्ती नसुन एक शक्ती आहे. मनासाठी परमार्थ आहे. मनाचे दारिद्र्य सदानाम घोष करणे गरजेचे आहे. कथा, कीर्तन, सप्ताह, पुण्यतिथ्या हे भक्ती उत्सव घडविणारे असतात. हसायला लावण्यासाठी कीर्तन नसावेत तर आत्मशोध, आत्मबोध करण्यासाठी असावेत. जीव कुटुंब वत्सल असतो, संत दिन वत्सल असतात. तृष्णा न संपणारे बेचैन असतात. गरजेपुरते धन असावे. भगवंताचे सतत स्मरण ठेवले तर एकदिवस माणुस हा भगवंताशी एकरुप होतो आणि सद्गुण संपन्न बनतो, सत्यनिष्ठ बनतो कारण परमात्मा हा एक सत्य आहे. सत्याचा स्वभाव आनंद आहे म्हणुन तो भगवंताचे स्मरणाने सदाआनंदी राहतो. माणसाने जीवनात तीनच कर्तव्ये करयचे असतात. एक सामान्य कर्तव्य आहे. ते म्हणजे स्वाभिमानाने जगण्यासाठी पैशाची प्राप्ती. पैसा हे साधन आहे साध्य नाही. कितीही पैसा मिळविला तरी पैसा सोबत येत नाही. यापुढे विशेष कर्तव्य आहे ते म्हणजे पुण्य प्राप्ती जनसेवा, दानधर्म, परोपकार यातुन पुण्यप्राप्ती होत असते. मुख्य कर्तव्य म्हणजे परमेश्वराची प्राप्ती.

# लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आज रक्तदान शिबिराचे आयोजन-सुनील शिंदे

बीड/वार्ताहर

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या ६१ व्या जयंतीनिमित्त आज रविवार, दिनांक २३ जून २०२३ रोजी शिवसंग्राम भवन,नगर रोड, बीड येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. समाजसुधारकाची जयंती वा पुण्यतिथी ही सामाजिक उपक्रमाने साजरी केली जावी जेणेकरून वंचित उपेक्षित गरिबांना याचा लाभ होतो व नकळत त्यांचे प्रश्न सुटत असतात.हा लोकनेते मेटे साहेबांचा सामाजिक व वैचारिक वारसा शिवसंग्राम सक्षमपणे चालवत आहे.त्या अनुषंगाने शिवसंग्राम भवन येथे आयोजित रक्तदान शिबिरात ,मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसंग्रामचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी केले आहे.

३० जून रोजी लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांची जयंती साजरी होत आहे . या जयंतीनिमित्त गरजू रुग्णांना तथा सीमेवर लढणाऱ्या जवानांसाठी रक्तपेढीची आवश्यकता असते आणि विशेष म्हणजे ही रक्ताची गरज कृतीमरीत्या पूर्ण



करण्यामध्ये आजही विज्ञानालाही अपयश आलेले आहे म्हणून रक्त हे साठवणूक करूनच ठेवावे लागते व इतर बांधवांची गरज पूर्ण करावी लागते हि गरज पूर्ण करण्यासाठी शिवसंग्राम सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करत आलेली आहे,लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांची ६१ वी जयंती निमित्ताने आज शिवसंग्राम भवन येथे सकाळी १०.०० पासून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब हे वंचित उपेक्षितांचे कैवारी म्हणून महाराष्ट्रभर त्यांची ओळख होती. मराठा आरक्षण व अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होण्यासाठी उभी हयात संघर्ष करणाऱ्या लोकनेते मेटे साहेबांचा वाढदिवस निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातील शिवसंग्रामचे मावळे पदाधिकारी कार्यकर्ते सामाजिक उपक्रम राबवून स्व.मेटे साहेबांना खऱ्या अर्थाने आदरांजली अर्पण करणार आहेत. याचाच एक भाग म्हणून शिवसंग्रामच्या वतीने शिवसंग्राम भवन बीड येथे आज भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणारे तसेच आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि ती फेडण्याची ही एक संधी आहे असे समजून जासतीत जास्त तरुणांनी रक्तदान करावे असे आवाहन शिवसंग्रामचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे .



## वटसावित्री सणाचे औचित्य साधून राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्ष जिल्हा बीडच्या वतीने शुक्रवारी वृक्षारोपण संपन्न

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्ष जिल्हा बीडच्या वतीने शुक्रवारी वटसावित्री सणाचे औचित्य साधून मानवी जीवनासाठी वृक्ष लागवड करणे हे खुप आवश्यक असून जास्तीत जास्त वृक्षारोपण करणे पुढील

अनेक पिंढ्यासाठी महत्वाचे आहे हा संदेश या सणाच्या निमित्ताने प्रत्येक घरोघरी जावा प्रत्येक ताईने एक तरी वृक्ष लावावा यासाठी झाडे लावा झाडे जगवा या संकल्पनेतून वटपौर्णिमेच्या निमित्ताने बीड येथे महिला प्रदेशाध्यक्ष आदरणीय रूपालीताई चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे वार्ड क्रमांक चोवीस, नाथ सृष्टी कॉलनी, अंकुश नगर बीड येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्षा प्रज्ञाताई खोसरे, जिल्हा कार्याध्यक्षा शालिनीताई परदेशी, शहर सचिव सुजाता कांबळे, कोमल राजपूत, नीता कांबळे, अनुराधा प्रकाश, अर्चनाताई देशमुख, श्रद्धा क्षीरसागर, इत्यादी महिला पदाधिकारी, सदस्य उपस्थित होत्या.

## योग साधनेतून डायबिटीस (शुगर) या आजारावर नियंत्रण मिळवता येवू शकते - योगप्रशिक्षक डॉ.राजेंद्र सारडा

बीड ।प्रतिनिधी

जगातील प्रत्येक व्यक्तीला कामाचा ताण असून मानसिक तणावामुळे अनेकांना डायबिटीस (शुगर) हा आजार होवू शकतो. डायबिटीस आजाराचे दोन प्रकार असून केवळ नियमित व्यायाम, योग साधनेतून शुगर सारख्या आजारांवर नियंत्रण मिळवता येवू शकते. शुगरच्या रुग्णांना भुक, तहान खुप लागणे तसेच वजन कमी होणे हे या आजाराची प्रमुख लक्षणे असून अनावश्यक चिंता, ताण- तणावामुळे शुगरचा आजार अनेक पटीने वाढू शकतो. योग साधनेतून डायबिटीस (शुगर) या आजारावर नियंत्रण मिळवता येवू शकते

असे योगप्रशिक्षक डॉ.राजेंद्र सारडा यांनी तर प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत योग साधना, प्राणायामास खुप महत्व असून आहार, विहार संस्कृती बदलत असल्यामुळे मधुमेह, दमा, कर्करोग यासह विविध आजार मोठ्या प्रमाणात वाढत असून आजारांना नियंत्रित करण्याचे काम योग साधनेतून होत असते. उत्तम आरोग्य, आदर्श जीवन शैली जगण्याचे माध्यम म्हणून योग साधनेकडे पाहिले जाते. योग साधना प्रत्येकाने नियमित अंमलात आणली तर अनेक व्याधीपासून मुक्त राहता येऊ शकते. निरोगी राहण्यासाठी नियमितपणे रोजच्या दिनचर्येत योगसाधना महत्वाची असल्याचे प्रतिपादन योग प्रशिक्षक जितेंद्र बोरा यांनी व्यक्त केले.

शुक्रवार दि.२१ रोजी जागतिक योग दिनाचे औचित्य साधून दीपमाळ योगा मित्र मंडळाच्या वतीने योगाभ्यास, ध्यानधारणा, सुर्यनमस्कार आदींसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन, योग गीताने करण्यात आली. याप्रसंगी पेठ बीड पोलीस स्टेशनचे पी.आय. मुदीराज साहेब, संपादक विजयराज बंब, सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, सि.ए.गोपाल कासट, जयसिंग मामा चुंगडे, मदन दुगड, डॉ . डॉ.शिवप्रसाद जाजु, अशोक शेटे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजु वंजारे, संचालक अभिजीत वैद्य आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पुण्यात पुन्हा हिट अँड रन प्रकरण

पुणे - अजित पवार यांच्या गटातील पुण्यातील खेडचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पुतण्याने कारखाली दोघांना चिरडल्याची घटना घडली. यात एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दुसरा गंभीर जखमी झाला आहेत. पुणे-नाशिक महामार्गावरील एकलहरे जवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

आमदाराच्या पुतण्याने दोघांना चिरडले

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील खेड तालुक्याचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पुतण्याकडून अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. आमदार पुतण्याने बेदरकारपणे गाडी चालवून दोघांना गाडीखाली चिरडले आहे. या अपघातात ओम सुनिल भालेराव याचा जागीच मृत्यू झाला आहे.

धडक देताच हवेत उडाली दुचाकी

पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पुतण्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयुर मोहिते असे आमदार मोहिते यांच्या पुतण्याचे नाव आहे. आमदार दिलीप मोहिते यांचा पुतण्या मयुर हा पुणे-नाशिक महामार्गावरून कारने पुण्याच्या दिशेने येत होता. तो विरुद्ध दिशेने सुसाट कार चालवत होता. त्यावेळी समोरून आलेल्या दोन दुचाकीस्वारांना कारने धडक दिली. अपघात इतका भीषण होता, की दुचाकीस्वार हवेत उडाली.

आरोपीने केली नाही जखमींना मदत

त्यानंतर डोक्याला मार लागल्याने अपघातात ओम भालेराव या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर एकजण गंभीर जखमी झाला. अपघातानंतर मयुर हा कारमध्येच बसून होता. त्याने जखमींना मदत देखील केली नसल्याचे सांगितले जात आहे. स्थानिकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली होती. अपघातानंतर मृत तरुणाच्या नातेवाईकांनी मंचर पोलिस स्टेशनबाहेर मोठी गर्दी केली होती. पोलिसांनी त्यांना शांततेचे आवाहन केले.


## दहावीतील विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्या:धनगर जवळका येथील धक्कादायक घटना

**पाटोदा - पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका येथील दहावीचे शिक्षण घेणाऱ्या १६ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. मानसी संतोष आगे असे गळफास घेतलेल्या विद्यार्थीनीचे नाव आहे. तिने गुरुवार रोजी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. कुटुंबातील व्यक्ती रागे भरल्यामुळे किरकोळ कारणावरून तिने हे पाऊल उचलल्याची चर्चा असून यासंदर्भात पाटोदा पोलीस ठाण्यात आकस्विक मृत्यूची नोंद झाली आहे.**

धनगर जवळका येथे राहणारी मानसी ही येथील जगदंबा विद्या मंदिरात इयत्ता दहावीच्या वर्गात शिक्षण घेते. यादरम्यान गुरुवार रोजी दुपारी ती शाळेत गेली नव्हती. घरात झोपण्यासाठी जात आहे असे सांगून ती खोलीत गेली व तिने दार लावून घेतले. यादरम्यान बराच वेळ झाले ते उठली नाही. म्हणून नातेवाईकांनी दरवाजा वाजवला. मात्र, त्यानंतर आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे कुटुंबिय घाबरले. त्यांनी अनेक वेळा मानसीला आवाज



देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरअखेर कुटुंबीयांनी दरवाजा तोडला. परंतु त्यानंतर आतील दृश्य पाहून त्यांना धक्का बसला. यादरम्यान मानसी हिचा मृतदेह घरातील छताच्या अँगल ला गळफास लावलेल्या स्थितीत आढळला. यामुळे घरच्यांनी लगेच इतरांच्या मततीने त्यानंतर तातडीने तिला पाठवता येतील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.



छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गाचे कामाच्या दर्जावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे पंधरा दिवसापूर्वी कवडगाव पुलाजवळ नवीन तयार करण्यात आलेल्या महामार्गावर अचानक जीवघेणा खड्डा पडल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी पुन्हा एकदा पिंपळवाडी फाट्याजवळ अचानक खड्डा पडल्याने उभी असलेली शाळकरी मुलांची बस खड्ड्यात कलंडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे .

गुरुवार दि. (२०) दुपारी अडीच वाजता पैठण जैन इंग्रजी शाळेची स्कूल बस एम एच (०४) एफके (१६१८) ही पिंपळवाडी फाट्याजवळ हॉटेल रजनी समोर उभी होती. पालक आपल्या मुलांना घेण्यासाठी आले . काही मुले बसमधून उतरत असतानाच बस अचानक मागच्या बाजूने कलंडली. बसचे मागील टायर अचानक भगदाड पडलेल्या खड्ड्यात रुतले त्यामुळे उभ्या बसचे टायर खड्डयात गेले.घाबरलेल्या शाळकरी मुलांनी गोंधळ केल्याने परिसरातील ग्रामस्थ धावत आले .

# फडणवीसांनी राज्यसभेसाठी तुमच्या नावाचा प्रस्ताव पाठवलाय?

### पंकजा मुंडेंनी एका वाक्यात दिलं उत्तर, 'मला अशी...'



लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला आहे. बीडमधून पंकजा मुंडे यांचा पराभवही भाजपाला मोठा धक्का देणारा ठरला. दरम्यान पंकजा मुंडे यांच्या पराभवानंतर त्यांचं राजकीय पुनर्वसन केलं जाण्याची शक्यता आहे. भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवा अशी विनंती केंद्र सरकारकडे केल्याची सूत्रांची माहिती आहे. पंकजा मुंडे यांना आणि ओबीसी समाजाला प्रातिनिधीत्व देणं गरजेचं असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. दरम्यान पंकजा मुंडे यांनी यावर एका वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे.

**भाजपाच्या तीन जागा रिक्त?**

भाजपाच्या राज्यात राज्यसभेच्या तीन जागा रिक्त झाल्या आहेत. पियूष गोयल, नारायण राणे आणि उदयनराजे भोसले हे राज्यसभेवरील तिन्ही सदस्य लोकसभेत गेल्याने रिक्त आहेत. या जागांवर भाजप कुणाला पाठवणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलंय. महाराष्ट्रातील नेत्यांची या जागांवर वर्णी लागणार की इतर राज्यातील नेत्यांना राज्यसभेवर पाठवलं जाईल हे पाहणं आता औत्सुक्याचं ठरणार आहे.

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा बीड लोकसभा मतदारसंघातून पराभव झाल्यानंतर त्यांनी राज्यसभेवर पाठवण्याची मागणी होत आहे. त्यांच्या समर्थकांकडून पक्षश्रेष्ठींना विनंती केली जात आहे. दरम्यान राज्यसभा किंवा आता ज्या कोणत्या जागा रिक्त होतील, तेव्हा पंकजा मुंडेंची वर्णी लावावी, अशी विनंती फडणवीसांनी भाजपच्या वरिष्ठ पक्षश्रेष्ठींकडे केल्याची माहिती मिळत आहे.

पंकजा मुंडे यांची आज पत्रकार परिषद पार पडली. यावेळी त्यांना राज्यसभेसाठी तुमच्या नावाचा प्रस्ताव पाठवण्यात आला असून देवेंद्र फडणवीस यांनी तशी केंद्राकडे विनंती केल्याची माहिती मिळत आहे असं विचारण्यात आलं. त्यावर त्यांनी 'मलाही अशी माहिती मिळत आहे' असं हसत उत्तर दिलं आणि निघून गेल्या.

भाजपाच्या महाराष्ट्रातील राज्यसभेच्या तीन जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे ही मागणी जोर धरत आहे. आमदार सुरेश धस काही दिवसांपूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना पंकजा मुंडे यांचं पुनर्वसन झालं पाहिजे ही मागणी लावून धरली होती. पंकजा मुंडे या ओबीसीच्या नेत्या आहेत. त्या पराभूत जरी झाल्या तरी त्यांचे राजकीय पुनर्वसन झाले पाहिजे, असा सूर बीडमधून येतोय. एवढंच नाही तर नगरमध्ये पोस्टरही लागले आहेत. भाजपच्या एकनिष्ठ अशा कार्यकर्त्या म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजामध्ये काही काम नाही अशा लोकांना राज्यसभेवर घेऊन त्यांना मंत्रीपद दिले जाते.




## ओबीसी आंदोलनाची धग गावागावांत पोहचत आहे - किशोर राऊत

### नाळवंडी येथील आंदोलनात सावता परिषद सहभागी

ओबीसी आरक्षण बचावासाठी प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचे वडीगोद्री जि.जालना येथे आमरण उपोषण सुरू आहे.त्यांच्या समर्थनार्थ राज्यात ठिकठिकाणी आंदोलन छेडण्यात येत आहेत. ओबीसी आंदोलनाची धग गावागावांत पोहचत असुन सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे मत सावता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष किशोर राऊत यांनी व्यक्त केले.

नाळवंडी ता.बीड येथे प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांना समर्थन देण्यासाठी संजय आबाराव काळे यांचे आमरण उपोषण आंदोलनाचा पाचवा दिवस आहे.या आंदोलनास सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे (काका) यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाध्यक्ष किशोर राऊत यांनी आंदोलनात सहभागी झाले. भूमिका व्यक्त करतांना किशोर राऊत म्हणाले की, राज्यातील ओबीसी अस्वस्थ आहे.ओबीसींचे आक्रमक आंदोलन सुरू आहेत.प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या आंदोलनाला पाठबळ देण्यासाठी राज्यातील ओबीसी एकजुट होऊन आंदोलन छेडत आहे.गावागावांत आंदोलनाची धग पोहचत आहे. ओबीसींच्या संघर्षलढ्यात सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सावता परिषद लढत आहे .सरकारने ओबीसींच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा अन्यथा राज्यात विदारक चित्र निर्माण होईल अशा इशारा सावता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष किशोर राऊत यांनी व्यक्त केला.याप्रसंगी सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ राजीव काळे, जिल्हा महासचिव प्रा रणजीत आखाडे, गवळी समाजाचे नेते शंकरराव लचके, परमेश्वर मेहेत्रे,सलीम बागवान आदिजण सोबत होते.

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या देठे कुटुंबीयांना मंत्री तानाजी सावंत यांनी दिला मदतीचा हात

### मराठा समाजाच्या सुख दुःखात कायम पाठीशी राहणार- मंत्री प्रा. तानाजी सावंत

पुणे ।प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी नुकतीच आत्महत्या केलेल्या प्रसाद देठे यांच्या कुटुंबियांना राज्याचे कुटुंब व कल्याण मंत्री प्रा. तानाजी सावंत यांनी सांत्वन पर भेट देऊन त्या कुटुंब यांना आधार देत ५ लाख रुपये सुपूर्द केले आहेत. दरम्यान मराठा समाजाच्या सुखदुःखात आपण कायम पाठीशी राहणार असल्याचे कुटुंब बालकल्याण मंत्री मराठा भूषण प्राध्यापक तानाजी सावंत यांनी सांगितले.

वाघोली, पुणे येथे मराठा आराक्षणासाठी आत्महत्या केलेल्या कै.प्रसाद देठे यांच्या कुटुंबाची महाराष्ट्र राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मराठा भूषण तानाजी सावंत यांनी भेट घेत सांत्वन केले. त्या कुटुंबाला पाहता क्षणी मंत्री प्रा. तानाजी सावंत यांना अश्रू अनावर झाले. समाजाप्रती असलेला कळवळा व समाजाला मदत करण्याची दानत त्यांनाच असते. ज्यांना आपल्या मातीला व समाजाला बसलेल्या चटक्याची जाण असते. याचीच प्रचिती येत आहे. मंत्री प्रा. तानाजी सावंत यांनी आजपर्यंत शेकडो गरजू व मराठा समाजासाठी आत्महत्या केलेल्या तरुणांना मदतीचा हात दिला



आहे. मराठा समाजाच्या तरुणांनी आरक्षणासाठी आपले जीवन संपवु नये. असे आवाहनही मराठा समाजाच्या युवकांना मंत्री प्रा सावंत त्यांनी केले आहे. यावेळी मराठा समाजातील असंख्य बांधव उपस्थित होते.मराठा आरक्षणासाठी आपले बलिदान दिलेल्या प्रसाद देठे यांना तात्काळ पाच लाख रुपयाची मदत करत त्यांच्या कुटुंबातील देठे यांचा मुलगा आणि दोन मुली अश्या तिन्ही मुलांना दत्तक घेत मुलांच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतची सर्व जवाबदारी आपण घेत असल्याचे यावेळी मंत्री प्रा. तानाजी सावंत सांगितले.आज तागायात मराठा समाजाच्या जवळ पास ९० ते १०० कुटुंबांना आर्थिक मदत करून मुलांना दत्तक घेऊन त्यांच पालकत्व प्रा.सावंत पार आहेत.

# सामान्य कार्यकर्ता म्हणून सर्वांच्या सेवेसाठी यापुढेही कार्यरत राहणार-विठ्ठल दंदे

परळी ।प्रतिनिधी

परळी शहर आणि परिसरातील माझ्या संपर्कात आलेल्या प्रत्येकानेच आपल्यावर मनापासून प्रेम केले असून या प्रेमाची शिदोरी घेत आपण कार्यरत आहोत. यापुढेही सामान्य कार्यकर्ता म्हणून सर्वांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास परळी नगर परिषदेचे माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल दंदे यांनी व्यक्त केला.

विठ्ठल दंदे यांचा वाढदिवस आज परळी शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. आज दिवसभर विविध ठिकाणी वाढदिवसानिमित्त विठ्ठल दंदे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना श्री विठ्ठल दंदे यांनी सांगितले की,



परळी शहर आणि परिसरातील नागरिकांचे आपल्यावर मनापासून प्रेम असून मी एक सामान्य कार्यकर्ता म्हणून सर्वांसाठी जे शक्य आहे ते काम करण्याचा प्रयत्न केला आहे. आपले आशिर्वाद आणि सहकार्य माझ्या पुढील आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे असून यापुढेही आपल्या सेवेत अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास विठ्ठल दंदे यांनी व्यक्त केला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT